खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

## विज्ञान विभाग उपक्रम

प्रभात

## मधमाशीपालनामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ - गुंजाळ

### हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात पाच दिवसीय प्रशिक्षण शिबिरास प्रतिसाद

**राजगुरुनगर, दि. २३ (प्रतिनिधी)** - ग्रामीण भागात शेतीसोबत पूरक उद्योग म्हणून मधमाशीपालनाचा वेगाने प्रसार होत असून शेतकरी व महिलांसाठी ते उत्पन्नवाढीचे प्रभावी साधन ठरत आहे. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळत असल्याचे प्रतिपादन युवा उद्योजिका श्रद्धा गुंजाळ यांनी केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय येथील प्राणीशास्त्र व रसायनशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय मधमाशीपालन आणि प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मधमाशीपालन : ग्रामीण उद्योजकता आणि आर्थिक सक्षमीकरण या विषयावर दि.१६ ते २० फेब्रुवारी दरम्यान पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. या वेळी प्रशिक्षक राहुल काळे, संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. योगेश वाळुंज आदी उपस्थित होते.

श्रद्धा गुंजाळ यांनी मधमाशीपालन हा शाश्वत व फायदेशीर ग्रामीण उद्योगाचा पर्याय असल्याचे सांगितले. ग्रामीण उद्योजकता विकास, उत्पादनाचे ब्रँडिंग, विपणन तंत्र तसेच शासकीय योजनांची माहिती देत त्यांनी विद्यार्थ्यांना व्यवसाय उभारणीसाठी प्रोत्साहित केले.

प्रशिक्षक राहुल काळे यांनी मधमाशीपालनाचे मूलभूत तत्वज्ञान, मधमाशांचे प्रकार, पेटी व्यवस्थापन, मध संकलन व प्रक्रिया, रोग व कीड नियंत्रण तसेच मधावर आधारित पूरक उद्योगांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील यांनी मधमाशा या पर्यावरण संतुलन, जैवविविधता व शेती उत्पादनवाढीसाठी अत्यावश्यक असल्याचे सांगून विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी कमी गुंतवणुकीत चांगला आर्थिक परतावा देणारा व्यवसाय म्हणून मधमाशीपालनाचे महत्त्व अधोरेखित केले.

प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यवसायाभिमुखता वाढीस लागेल, असा विश्वास व्यक्त केला. ग्रामीण युवक-युवतींना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि कृषीपूरक व्यवसायांना चालना देणे हा या प्रशिक्षण शिबिराचा उद्देश असल्याचे आयोजक डॉ. सागर थेऊरकर व डॉ. योगेश वाळुंज यांनी सांगितले. या शिबिरात तब्बल १८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सूत्रसंचालन प्रा. सुनिता जाधव यांनी केले, प्रास्ताविक प्रा. निता डोंगरे यांनी केले तर प्रा. योगिता डुंबरे यांनी आभार मानले.

Pune Gramin Edition
Feb 24, 2026 Page No. 13
Powered by: erelego.com

केसरी

किरण खुडे (पत्रकार)

# शेतकऱ्यांसाठी मधमाशीपालनातून नवा उत्पन्नाचा स्रोत : श्रद्धा गुंजाळ

**राजगुरूनगर (वार्ताहर) :** ग्रामीण भागात शेतीसोबत पूरक उद्योग म्हणून मधमाशीपालनाचा वेगाने प्रसार होत असून शेतकरी आणि महिलांसाठी ते उत्पन्नवाढीचे प्रभावी साधन ठरत असल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळत असल्याचे प्रतिपादन युवा उद्योजिका श्रद्धा गुंजाळ यांनी केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील प्राणीशास्त्र व रसायनशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय मधमाशीपालन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मधमाशीपालन ग्रामीण उद्योजकता आणि आर्थिक सक्षमीकरण या विषयावरील पाच दिवशीय प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी प्रशिक्षक राहुल काळे, संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. योगेश वाळुंज उपस्थित होते.




श्रद्धा गुंजाळ यांनी बोलताना मधमाशीपालन हा ग्रामीण उद्योगाचा शाश्वत आणि फायदेशीर पर्याय ठरत असल्याचे सांगितले. ग्रामीण उद्योजकता विकास, उत्पादनाचे ब्रँडिंग, विपणन तंत्र आणि शासकीय योजनांची माहिती देऊन त्यांनी विद्यार्थ्यांना व्यवसाय उभारणीसाठी प्रोत्साहन दिले.

मधमाशीपालन प्रशिक्षक राहुल काळे यांनी प्रशिक्षणामध्ये मधमाशी पालनाचे मूलभूत तत्त्वज्ञान, मधमाशांचे प्रकार, पेटी व्यवस्थापन, मध संकलन व प्रक्रिया, रोग व कीड नियंत्रण, तसेच मधावर आधारित पूरक उद्योग याविषयी मार्गदर्शन केले.

संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील यांनी मधमाशा या पर्यावरण संतुलन, जैवविविधता आणि शेती उत्पादन वाढीसाठी अत्यावश्यक असल्याचे सांगून विद्यार्थ्यांना मधमाशीपालन प्रशिक्षणासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी मधमाशीपालनाचे शेतीसाठी होणारे फायदे स्पष्ट करताना तुलनेने कमी गुंतवणूकीत चांगला आर्थिक परतावा मिळणारा व्यवसाय असल्याचे सांगितले. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी मधमाशीपालन कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यवसायभिमुखता वाढीस लागेल असे सांगितले.

शिबिराचे आयोजन डॉ.सागर थेऊरकर, डॉ.योगेश वाळूंज यांनी केले. यात १८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन प्रा. सुनिता जाधव व प्रास्ताविक प्रा. निता डोंगरे यांनी केले. प्रा. योगिता डुंबरे यांनी आभार मानले.



प्रसिद्धी विभाग (२०२५ - २०२६)

# मधमाशीपालन उत्पन्नवाढीचे प्रभावी साधन

## युवा उद्योजिका श्रद्धा गुंजाळ यांचे प्रतिपादन; पाचदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम

**राजगुरुनगर** : ग्रामीण भागात शेतीसोबत पूरक उद्योग म्हणून मधमाशीपालनाचा वेगाने प्रसार होत आहे. शेतकरी आणि महिलांसाठी ते उत्पन्नवाढीचे प्रभावी साधन ठरत असल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळत असल्याचे प्रतिपादन युवा उद्योजिका श्रद्धा गुंजाळ यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील प्राणीशास्त्र व रसायनशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय मधमाशीपालन आणि प्रशिक्षण संस्था (पुणे) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मधमाशीपालन ग्रामीण उद्योजकता आणि आर्थिक सक्षमीकरण या विषयावरील पाचदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. याप्रसंगी प्रशिक्षक राहुल काळे, संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. योगेश वाळुंज उपस्थित होते.

श्रद्धा गुंजाळ म्हणाल्या, मधमाशीपालन हा ग्रामीण उद्योगाचा शाश्वत आणि फायदेशीर पर्याय ठरत असल्याचे सांगितले. ग्रामीण उद्योजकता विकास, उत्पादनाचे ब्रँडिंग, विपणन तंत्र आणि शासकीय योजनांची माहिती देऊन त्यांनी विद्यार्थ्यांना व्यवसाय उभारणीसाठी प्रोत्साहन दिले. मधमाशीपालन प्रशिक्षक राहुल काळे यांनी प्रशिक्षणामध्ये मधमाशी पालनाचे मूलभूत तत्त्वज्ञान, मधमाशांचे प्रकार, पेटी व्यवस्थापन, मध संकलन व प्रक्रिया, रोग व कीड नियंत्रण, तसेच मधावर आधारित पूरक उद्योग याविषयी मार्गदर्शन केले.




**राजगुरुनगर : मधमाशीपालन ग्रामीण उद्योजकता आणि आर्थिक सक्षमीकरण या विषयावरील पाचदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवर.**

### शेतकऱ्यांसाठी पूरक व्यवसाय

शेतीला जोडधंदा म्हणून मधमाशीपालन व्यवसाय महत्त्वपूर्ण आहे. त्या संदर्भात जनजागृती करण्यासाठी पाचदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी मान्यवरांनी महत्त्वपूर्ण अशी माहिती दिली.

संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील यांनी मधमाशा या पर्यावरण संतुलन, जैवविविधता आणि शेती उत्पादन वाढीसाठी अत्यावश्यक असल्याचे सांगून विद्यार्थ्यांना मधमाशीपालन प्रशिक्षणासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी मधमाशीपालनाचे शेतीसाठी होणारे फायदे स्पष्ट करताना तुलनेने कमी गुंतवणुकीत चांगला आर्थिक परतावा मिळणारा व्यवसाय असल्याचे सांगितले. प्राचार्य डॉ. पिंगळे यांनी मधमाशीपालन कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यवसायभिमुखता वाढीस लागेल असे सांगितले.

लोकमत

# मधमाशीपालनातून नवा उत्पन्नाचा स्रोत : गुंजाळ

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर** : ग्रामीण भागात शेतीसोबत पूरक उद्योग म्हणून मधमाशीपालनाचा वेगाने प्रसार होत आहे. शेतकरी आणि महिलांसाठी ते उत्पन्नवाढीचे प्रभावी साधन ठरत असल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळत आहे, असे प्रतिपादन युवा उद्योजिका श्रद्धा गुंजाळ यांनी केले.

त्या खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील प्राणीशास्त्र व रसायनशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय मधमाशीपालन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "मधमाशीपालन : ग्रामीण उद्योजकता आणि आर्थिक सक्षमीकरण" या विषयावरील पाच दिवसीय (दि.१६ ते २०) प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होत्या.

या प्रसंगी प्रशिक्षक राहुल काळे, संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. योगेश वाळुंज उपस्थित होते. श्रद्धा गुंजाळ यांनी बोलताना मधमाशीपालन हा ग्रामीण उद्योगाचा शाश्वत आणि फायदेशीर पर्याय असल्याचे सांगितले. ग्रामीण उद्योजकता विकास, उत्पादनाचे ब्रँडिंग, विपणन तंत्र आणि शासकीय योजनांची

**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मधमाशीपालन याविषयी प्रशिक्षण**

माहिती देऊन त्यांनी विद्यार्थ्यांना व्यवसाय उभारणीसाठी प्रोत्साहन दिले.

मधमाशीपालन प्रशिक्षक राहुल काळे यांनी प्रशिक्षणामध्ये मधमाशी पालनाचे मूलभूत तत्त्वज्ञान, मधमाश्यांचे प्रकार, पेटी व्यवस्थापन, मध संकलन व प्रक्रिया, रोग व कीड नियंत्रण, तसेच मधावर आधारित पूरक उद्योग याविषयी मार्गदर्शन केले. संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील यांनी सांगितले की मधमाशा पर्यावरण संतुलन, जैवविविधता आणि शेती उत्पादन वाढीसाठी अत्यावश्यक आहेत आणि त्यांनी विद्यार्थ्यांना मधमाशीपालन प्रशिक्षणासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी मधमाशीपालनाचे शेतीसाठी होणारे फायदे स्पष्ट करताना, तुलनेने कमी गुंतवणुकीत चांगला आर्थिक परतावा मिळणारा व्यवसाय असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील युवक-युवतींना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि कृषीपूरक व्यवसायांना चालना देणे या उद्देशाने या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन डॉ. सागर थेऊरकर आणि डॉ. योगेश वाळूंज यांनी केले.

Hello Pune Gramin
Page No. 6 Feb 27, 2026
Powered by: erelego.com

# शेतकऱ्यांसाठी मधमाशीपालनातून नवा उत्पन्नाचा स्रोत : श्रद्धा गुंजाळ

**राजगुरूनगर (वार्ताहर) :** ग्रामीण भागात शेतीसोबत पूरक उद्योग म्हणून मधमाशीपालनाचा वेगाने प्रसार होत असून शेतकरी आणि महिलांसाठी ते उत्पन्नवाढीचे प्रभावी साधन ठरत असल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळत असल्याचे प्रतिपादन युवा उद्योजिका श्रद्धा गुंजाळ यांनी केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील प्राणीशास्त्र व रसायनशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय मधमाशीपालन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मधमाशीपालन ग्रामीण उद्योजकता आणि आर्थिक सक्षमीकरण या विषयावरील पाच दिवशीय प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी प्रशिक्षक राहुल काळे, संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. योगेश वाळुंज उपस्थित होते.




श्रद्धा गुंजाळ यांनी बोलताना

मधमाशीपालन हा ग्रामीण उद्योगाचा शाश्वत आणि फायदेशीर पर्याय ठरत असल्याचे सांगितले. ग्रामीण उद्योजकता विकास, उत्पादनाचे ब्रँडिंग, विपणन तंत्र आणि शासकीय योजनांची माहिती देऊन त्यांनी विद्यार्थ्यांना व्यवसाय उभारणीसाठी प्रोत्साहन दिले.

मधमाशीपालन प्रशिक्षक राहुल काळे यांनी प्रशिक्षणामध्ये मधमाशी पालनाचे मूलभूत तत्त्वज्ञान, मधमाशांचे प्रकार, पेटी व्यवस्थापन, मध संकलन व प्रक्रिया, रोग व कीड नियंत्रण, तसेच मधावर आधारित पूरक उद्योग याविषयी मार्गदर्शन केले.

संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील यांनी मधमाशा या पर्यावरण संतुलन, जैवविविधता आणि शेती उत्पादन वाढीसाठी अत्यावश्यक असल्याचे सांगून विद्यार्थ्यांना मधमाशीपालन प्रशिक्षणासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी मधमाशीपालनाचे शेतीसाठी होणारे फायदे स्पष्ट करताना तुलनेने कमी गुंतवणूकीत चांगला आर्थिक परतावा मिळणारा व्यवसाय असल्याचे सांगितले. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी मधमाशीपालन कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यवसायभिमुखता वाढीस लागेल असे सांगितले.

शिबिराचे आयोजन डॉ.सागर थेऊरकर, डॉ.योगेश वाळूंज यांनी केले. यात १८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन प्रा. सुनिता जाधव व प्रास्ताविक प्रा. निता डोंगरे यांनी केले. प्रा. योगिता डुंबरे यांनी आभार मानले.

# मधमाशीपालनातून उत्पन्नाचा स्त्रोत : गुंजाळ

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

ग्रामीण भागात शेतीसोबत पूरक उद्योग म्हणून मधमाशीपालनाचा वेगाने प्रसार होत असून, शेतकरी आणि महिलांसाठी तो उत्पन्नवाढीचे प्रभावी साधन ठरत आहे. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळत असल्याचे प्रतिपादन युवा उद्योजिका श्रद्धा गुंजाळ यांनी केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय येथील प्राणिशास्त्र व रसायनशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय मधमाशीपालन आणि प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने 'मधमाशीपालन : ग्रामीण उद्योजकता आणि आर्थिक सक्षमीकरण' या विषयावर पाचदिवसीय (दि. १६ ते २० फेब्रुवारी) प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. या वेळी प्रशिक्षक राहुल काळे, संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. योगेश वाळुंज आदी उपस्थित होते.

संस्थ अध्यक्ष बुट्टेपाटील यांनी मधमाश्या पर्यावरण संतुलन, जैवविविधता आणि शेती उत्पादनवाढीसाठी अत्यावश्यक असल्याचे अधोरेखित करीत प्रशिक्षणासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी कमी गुंतवणुकीत अधिक आर्थिक परतावा देणारा हा व्यवसाय असल्याचे स्पष्ट केले.

ग्रामीण युवक-युवतींना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि कृषिपूरक व्यवसायांना चालना देणे या उद्देशाने डॉ. सागर थेऊरकर व डॉ. वाळुंज यांच्या पुढाकारातून या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात १८० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सूत्रसंचालन प्रा. सुनीता जाधव यांनी केले. प्रास्ताविक प्रा. नीता डोंगरे यांनी केले. प्रा. योगिता डुंबरे यांनी आभार मानले.

**दै. सकाळ**

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
23 Feb 2026 - Page 3

# मधमाशीपालनातून नवा उत्पन्नाचा स्रोत - श्रद्धा गुंजाळ

**राजगुरूनगर-किरण खुडे**
**(दै. आरंभ पर्व)**




ग्रामीण भागात शेतीसोबत पूरक उद्योग म्हणून मधमाशीपालनाचा वेगाने प्रसार होत असून शेतकरी आणि महिलांसाठी ते उत्पन्नवाढीचे प्रभावी साधन ठरत असल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळत असल्याचे प्रतिपादन युवा उद्योजिका श्रद्धा गुंजाळ यांनी केले. त्या खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील प्राणीशास्त्र व रसायनशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय मधमाशीपालन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मधमाशीपालन ग्रामीण उद्योजकता आणि आर्थिक सक्षमीकरण या विषयावरील पाच दिवसीय (दि.१६ ते २०) प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होत्या. या प्रसंगी प्रशिक्षक राहुल काळे, संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. योगेश वाडेकर उपस्थित होते.

श्रद्धा गुंजाळ यांनी बोलताना मधमाशीपालन हा ग्रामीण उद्योगाचा शाश्वत आणि फायदेशीर पर्याय ठरत असल्याचे सांगितले. ग्रामीण उद्योजकता विकास, उत्पादनाचे ब्रँडिंग, विपणन तंत्र आणि शासकीय योजनांची माहिती देऊन त्यांनी विद्यार्थ्यांना व्यवसाय उभारणीसाठी प्रोत्साहन दिले.

मधमाशीपालन प्रशिक्षक राहुल काळे यांनी प्रशिक्षणामध्ये मधमाशी पालनाचे मूलभूत तत्त्वज्ञान, मधमाशांचे प्रकार, पेटी व्यवस्थापन, मध संकलन व प्रक्रिया, रोग व कीड नियंत्रण, तसेच मधावर आधारित पूरक उद्योग याविषयी मार्गदर्शन केले.

संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील यांनी मधमाशा या पर्यावरण संतुलन, जैवविविधता आणि शेती उत्पादन वाढीसाठी अत्यावश्यक असल्याचे सांगून विद्यार्थ्यांना मधमाशीपालन प्रशिक्षणासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी मधमाशीपालनाचे शेतीसाठी होणारे फायदे स्पष्ट करताना तुलनेने कमी गुंतवणुकीत चांगला आर्थिक परतावा मिळणारा व्यवसाय असल्याचे सांगितले.

प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी मधमाशीपालन कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यवसायभिमुखता वाढीस लागेल असे सांगितले.

ग्रामीण भागातील युवक-युवतींना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि कृषीपूरक व्यवसायांना चालना देणे या उद्देशाने या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन डॉ. सागर येऊरकर, डॉ. योगेश वाडेकर यांनी केले. यात १८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन प्रा. सुनिता जाधव व प्रास्ताविक प्रा. निता ढोरे यांनी केले. प्रा. योगिता दुंबरे यांनी आभार मानले.

HRN

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख